# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.12.2024** **वार – शनिवार**

---

**सोसायट्या**

पुणे जिल्ह्यातील 1366 विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था ऑनलाइन प्रणालीद्वारे जोडल्या जाणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांनी दिली आहे. ही ऑनलाइन प्रणाली सुरू झाल्यानंतर प्रत्येक सहकारी संस्थेत होणारे कर्ज वाटप, शेअर्स कपात, व्याज कपात आणि प्रत्येक दिवसाचे काम हे तालुका स्तरावर, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवर संबंधित सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांना दिसणार आहे. तसेच, आगामी काळात संस्थाचे लेखापरीक्षणदेखील ऑनलाइन पद्धतीनेच होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे अधिक सहज शक्य होणार आहे, तसेच सर्व संस्थांचा कारभार पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

**रासने**

नागपूरात सुरू असलेल्या विधीमंडळ हिवाळी अधिवेशनात  आमदार हेमंत रासने यांनी पुण्यातील कसबा पेठेतील समस्या मांडल्या. आज विधानसभेत पुरवणी मागण्यासंबंधित चर्चेत बोलत असताना रासने यांनी खडक पोलीस वसाहतीचे पुनर्वसन तसेच 2004 पासून संथ गतीने सुरू असणाऱ्या मामलेदार कचेरीच्या कामालादेखील गती देण्याची मागणी राज्य सरकारला केली. त्याचबरोबर 139 निवासस्थानांचे पुनर्वसन करण्याची मागणी रासने यांनी यावेळी केली.

**पाणी**

पुणे शहरातील पाणीपुरवठ्याच्या वाढत्या तक्रारींकडे शासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करून केली. छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात कमी दाबाने तसेच अपुरे पाणी येत असल्याने नागरिक तक्रारी करत आहेत. मात्र, प्रशासनाकडून याबाबत बोलण्यास नकार दिला जात असल्याचं शिरोळे यांनी सभागृहात सांगितले.

**आरोग्य महोत्सव**

आरोग्य चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून भान जागविण्याचे कार्य केलं जात असल्याचं प्रतिपादन प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट  पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी आज पुण्यात  केले. 13 व्या आरोग्य चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं आहे. यावर्षी महोत्सवात मानसिक आरोग्य, स्तनांचा कर्करोग, अवयव दान, पर्यावरण आदी विषयांवरील 34 लघुपट आणि माहितीपट दाखवले जाणार आहेत.

**महा आरोग्य शिबीर**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेतर्फे स.प  महाविद्यालयाच्या मैदानावर हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ट्रस्टची दोन दालने उभारण्यात आली आहेत. या शिबीराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यावेळी उपस्थित होते.

**नेत्रतज्ज्ञ**

पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेची 17 वी वार्षिक परिषद ‘स्पेक्ट्रम 2024 ’चे आयोजन महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या संयुक्त विद्यमाने औंधमधील भारतीय विज्ञान आणि संशोधन संस्था इथं करण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ‘ऑल इंडिया ऑप्थल्मोलॉजिकल सोसायट चे अध्यक्ष डॉ. समर बसक, ज्येष्ठ नेत्रचिकित्सक डॉ. तात्याराव लहाने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.परिषदेत नेत्र विज्ञान क्षेत्रातील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन उपाययोजना यांवर चर्चा झाली.

**बालरंगभूमी**

मुलांना सकस आहार, अन्न मिळावं म्हणून आपण जसे दक्ष असतो तसेच मुलांना चांगलं मनोरंजन मिळावं यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमी संमेलनाध्यक्ष नटवर्य मोहन जोशी यांनी केले. बालरंगभूमी परिषदेतर्फे आयोजित पहिल्या बालरंगभूमी संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून ते अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते. उदघाटन सोहळ्याला व्यासपीठावर उदघाटक डॉ. मोहन आगाशे, संमेलनाध्यक्ष नटवर्य मोहन जोशी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष विजय गोखले, ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

**अधिकाऱ्यांसाठी साहित्य लेखन**

शासनात कार्यरत असताना सहकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळणारी सापत्न भावाची वागणूक, तांत्रिक धोरणात्मक अडचणी, गैरसमज अशा आव्हानांना सामोरे जावे लागल्याची भावना शासकीय सेवेत राहून लेखन करणाऱ्या लेखकांनी व्यक्त केली. पुण्यात आयोजित पहिल्या राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनातील ‘अधिकाऱ्यांसाठी साहित्य लेखनातील आव्हाने या विषयावर परिसंवादात लेखकांनी या भावना व्यक्त केल्या. भारत सासणे, पानिपतकार विश्वास पाटील आदि यावेळी उपस्थित होते.

**गणित दिवस**

गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यातील रमणबाग प्रशालेत राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त गणितातील सममिती संकल्पना स्पष्ट करणारी  वीस फुटी प्रतिकृती करण्यात आली होती. यावेळी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियमाक मंडळाचे सदस्य डॉक्टर विनयकुमार आचार्य आणि आयआयटी खडकपूर येथील अध्यापक डॉक्टर स्वानंद खरे , मुख्याध्यापक चारुता प्रभुदेसाई उपस्थित होते.

**कारवाई**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांविरोधात कारवाई तीव्र केली आहे. गेल्या दोन महिन्यांत 47 हजार रुपये दंड वसूल केला तसच 2 गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत.

**क्रीडा**

कमोडोर एल.एस. मेहता यांच्या स्मरणार्थ  'गुरू विजय दळवी करंडक 14 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब 25-25 षटकांच्या क्रिकेट  स्पर्धेत घुले ॲकॅडमीने पृथ्वीज् यंगस्टर्स क्लबचा 9 गडी राखून पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात 22 यार्डस क्रिकेट ॲकॅडमीने विजयी सलामी दिली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**